आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१० सप्टेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- सायबर सुरक्षा हा विषय केवळ डिजिटल व्यवहारांपुरता सीमित राहिला नसून देशाच्या संरक्षण यंत्रणेचा अविभाज्य घटक बनल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- आय फोर सी म्हणजेच भारतीय सायबर अपराध प्रतिबंधक समन्वय केंद्राच्या चार नवीन यंत्रणांचं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाची व्यवस्थापन समिती स्थापन

**आणि**

- शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार विजय अर्थात अप्पा साळवी यांचं निधन

**<><><><><>**

सायबर सुरक्षा हा विषय केवळ डिजिटल व्यवहारांपुरता सीमित राहिला नसून देशाच्या संरक्षण यंत्रणेचा अविभाज्य घटक बनल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. आय फोर सी म्हणजेच भारतीय सायबर अपराध प्रतिबंधक समन्वय केंद्राच्या पहिल्या वर्धापन दिन सोहळ्यात आज नवी दिल्ली इथं ते बोलत होते. जगातल्या एकूण डिजिटल व्यवहारांपैकी जवळजवळ निम्मे व्यवहार भारतात होतात, त्यामुळे भारतात सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी अधिकाधिक आधुनिक तंत्रज्ञान आवश्यक असल्याचं ते

म्हणाले. सायबर गुन्ह्यांविषयीच्या माहितीचं सर्वसमावेशक संकलन करण्यासाठी समन्वय या मंचाचं तसंच संशयित बाबींची नोंद करणाऱ्या सस्पेक्ट रजिस्ट्रीचं उद्घाटन त्यांनी केलं. या मंचावरची माहिती सर्व चौकशी यंत्रणांना उपलब्ध असेल. सायबर फ्रॉड मिटिगेशन सेंटरचं लोकार्पणही शहा यांनी या कार्यक्रमात केलं. सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या पोलिसांना सायबर गुन्हेगारीविषयी माहिती आणि उपाययोजनांचं प्रशिक्षम देणाऱ्या सायबर कमांडो कार्यक्रमाचा प्रारंभ त्यांनी केला. सायबर गुन्हेगारी आणि त्यापासून बचावाचे उपाय याविषयी जनजागृती करण्यासाठी आय फोर सी मार्फत विशेष कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. देशभरातल्या ७२ दूरचित्रवाहिन्या, चित्रपटगृहं आणि इतर माध्यमातून जनतेपर्यंत ही माहिती पोहचवली जाणार आहे. सायबर सुरक्षेसाठी १९३० हा दूरध्वनी मदत क्रमांक आय फोरसीनं उपलब्ध करुन दिला आहे. या जनजागृती मोहिमेत सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी सहभाग घ्यावा, असं आवाहन शहा यांनी केलं.

<><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची संसदीय राजभाषा समितीच्या अध्यक्षपदी एकमतानं फेरनिवड झाली आहे. नव्या सरकारच्या स्थापनेनंतर राजभाषा संसदीय समितीची पुनर्रचना करण्यासाठी काल नवी दिल्लीत समितीची बैठक झाली. त्यात ही निवड करण्यात आली. सर्व सरकारी यंत्रणांमध्ये २०४७ पर्यंत भारतीय भाषांचा वापर केला जाण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेनं सरकार वाटचाल करत असल्याचं शहा यांनी या निवडीनंतर सांगितलं. अमित शहा

यांनी २०१९ ते २०२४ या कालावधीत समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहिलं होतं. राजभाषा विभाग एक सॉफ्टवेअर विकसित करत असून, त्याआधारे आठव्या सूचीतल्या सर्व भाषा स्वयंचलितपणे अनुवादित केल्या जातील, असंही शहा यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रीय महामार्गांवर उपग्रह संदेश प्रणालीमार्फत टोल भरण्यासाठी एक मार्गिका राखीव ठेवण्यात येणार आहे. या मार्गिकेतून जाणाऱ्या वाहनांमधे ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाईट यंत्रणा बसवलेली असली पाहिजे, अन्यथा या वाहनांकडून दुप्पट टोल वसूल केला जाईल असं रस्ते वाहतूक आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. वाहतुकीचा राष्ट्रीय परवाना नसलेल्या मात्र जीएनएसएस लावलेल्या वाहनांना राष्ट्रीय महामार्गाचा वापर २० किलोमीटर अंतरापर्यंत विनाशुल्क करता येईल.

<><><><><>

मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन कॉरीडॉरच्या दुतर्फा ध्वनी रोधक बसवण्याचं काम सुरू असून आतापर्यंत ८७ किलोमीटर अंतरापर्यंत ध्वनीरोधक बसवले गेले आहेत. यात १ लाख ७५ हजार ध्वनीरोधक गुजरातमध्ये बसवण्यात आले आहेत. ध्वनीरोधकांच्या निर्मितीसाठी सुरत, आनंद आणि अहमदाबादमध्ये तीन कारखाने उभारण्यात आले आहेत. ट्रेनमुळे होणारा आवाज कमी करणं हा हे ध्वनीरोधक बसवण्याचा हेतू आहे.

हे ध्वनीरोधक एक मीटर रुंद, दोन मीटर उंच आणि आठशे ते साडे आठशे किलो वजनाचे कॉंक्रीट पॅनल्स आहेत. यामुळे **ट्रेन**, ट्रेनचा खालचा भाग, चाकं यामुळे होणारा गोंगाट कमी होण्यास मदत होईल.

**<><><><><>**

अवयवदान अनेकांसाठी जीवनदान ठरू शकतं, त्यामुळे प्रत्येकाने अवयवदानाचा संकल्प करावा, असं आवाहन केंद्रीय आयुष, आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं आहे. अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीने आयोजित केलेल्या अवयवदान जनजागृती सोहळ्यात ते बोलत होते. अकोला जिल्ह्यातल्या १६ हजार नागरिकांनी अवयवदानाचा संकल्प केला असून हा एक विक्रम असल्याचं जाधव म्हणाले. या सोहळ्यात उपस्थितांनी अवयवदान करण्याची शपथ घेतली. तसंच अवयवदानाचा संकल्प घेतलेल्यांचा कृतज्ञता पत्र देऊन सन्मान करण्यात आला.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं व्यवस्थापन समिती स्थापन केली आहे. तीन सहसंयोजक, विविध स्तरांवरच्या समित्यांचे प्रमुख, विशेष आमंत्रित आणि पदसिद्ध सदस्यांचा यात समावेश असल्याची माहिती माजी केंद्रीय राज्यमंत्री आणि समितीचे अध्यक्ष रावसाहेब दानवे यांनी दिली. बूथ पर्यंतची यंत्रणा सक्षम करण्यासाठी पक्षातर्फे ही व्यवस्थापन समिती तयार केल्याचं ते म्हणाले. जाहीरनामा समितीचं प्रमुखपद सुधीर मुनगंटीवार

यांच्याकडे देण्यात आलं असून प्रचार यंत्रणा रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली असेल. महायुती निवडणूक अभियान समन्वयक म्हणून गिरीश महाजन काम पाहणार आहेत. विशेष आमंत्रित म्हणून नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे, देवेंद्र फडणवीस, पीयूष गोयल, विनोद तावडे, आशिष शेलार, नारायण राणे यांच्यासह पक्षाचे अन्य नेते या समितीमध्ये असतील.

**<><><><><>**

**राज्यात** ठिकठिकाणी गणेशोत्सव उत्साहाने साजरा होत आहे. सांगली जिल्ह्यातल्या ७९ गावात एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवण्यात आली असून या गावांचा विशेष प्रोत्साहनपर पारितोषिक देऊन गौरव करण्यात येईल. कोकणात गणेशोत्सवाचं भजन संस्कृतीशी अतूट नातं आहे. ही बाब लक्षात घेऊन गेल्यावर्षीपासून सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या वतीने भजन साहित्याचं वाटप करण्यात येत आहे. यंदाही अनेक भजनी मंडळांना भजन साहित्याचं वाटप झालं.

तर **ठाणे** जिल्ह्यात शासकीय योजनांच्या प्रसिद्धीसाठी विहंग गार्डन गणेशोत्सव सांस्कृतिक मंडळात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे बॅनर्स लावण्यात आले आहेत.

श्रोते हो, पुण्यातून सुरू झालेला सार्वजनिक गणेशोत्सव आता आंतरराष्ट्रीय झाला आहे. विविध देशात गणेशोत्सव कशा पद्धतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेणार आहोत. आकाशवाणी मुंबईवरून

रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये, दररोज. तेव्हा ऐकायला विसरू नका, आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव आकाशवाणीवर.

<><><><>

सिंधुदुर्गातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा पडल्याप्रकरणी मुर्तीकार जयदीप आपटे यांची पोलिस कोठडी न्यायालयानं शुक्रवारपर्यंत वाढवली आहे. दुसरा आरोपी चेतन पाटील याची रवानगी न्यायालयीन कोठडी झाली आहे. दोघांची पोलीस कोठडी आज संपल्यानं दोघांना आज न्यायालयात हजर केलं होतं.

<><><><>

शालेय विद्यार्थ्यांच्या  सुरक्षिततेच्या दृष्टीने अकोला जिल्ह्यातल्या १ हजार ८२५ शाळांमध्ये गेल्या ६ तारखेपर्यंत सखी सावित्री समित्या स्थापन करण्यात आल्या असून शाळा स्तरावर या समित्यांकडून विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत. अलीकडच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर शाळांमध्ये या समित्या स्थापन करण्याची उपयुक्तता अधिक वाढली आहे. त्याअनुषंगाने अकोला जिल्ह्यात जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका आणि अनुदानित तसंच विनाअनुदानित १ हजार ८३५ पैकी १ हजार ८२५ शाळांमध्ये सखी सावित्री समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

<><><><>

**छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यातल्या पैठण इथल्या जायकवाडी धरणाचे बारा दरवाजे अर्ध्या फुटानं उघडून गोदावरी नदीपात्रात सहा हजार २८८ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी विसर्ग करण्यात येत आहे. सध्या धरणात १५ हजार ४६० घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याची आवक होत असून, पाणी साठा साडे ९८ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. आवक वाढल्यावर विसर्ग वाढवण्यात येईल. त्यामुळे नदीकाठच्या गावातल्या नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असं आवाहन जलसंपदा विभागाकडून करण्यात आलं आहे.

**भंडारा** जिल्ह्यात काल रात्रीपासून संततधार पाऊस सुरू असून वैनगंगा नदी दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे गोसीखुर्द धरणाच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने धरणाच्या ३३ दरवाज्यांपैकी २५ दरवाजे अर्ध्या मीटरनं उघडले आहेत. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागानं भंडारा जिल्ह्याला रेड अलर्ट दिला आहे.

**गोंदिया** जिल्ह्यात काल रात्री ढगफुटी सारखा पाऊस पडल्यामुळे जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. गोंदिया शहरातून वाहणाऱ्या नाल्यालगतचं घर पाण्यात कोसळून एकाचा मृत्यू झाला आहे. तर एक महिला घराच्या ढिगाऱ्याखाली अडकल्याचं वृत्त आहे. बचाव कार्य सुरू आहे. गोंदिया जिल्ह्यात सूर्याटोला भागाला बांध तलाव ओसंडून वाहू लागल्यामुळे अनेक घरात पाणी शिरलं आहे तर ग्रामीण भागात नदी नाले

ओसंडून वाहू लागले असून, आणि अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. काल रात्री पासून जनजीवन विस्कळीत झालं आहे.

**<><><><><>**

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार विजय अर्थात अप्पा साळवी यांचं काल रात्री रत्नागिरीतल्या खासगी रुग्णालयात वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. रत्नागिरी जिल्ह्यात शिवसेना रुजवण्यात आणि वाढवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

**//<><><><><>//**